उप विभागीय अधिकारी वसमत जि. हिंगोली

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अन्वये समुचित शासनाने वापरावयाच्या नमुन्यामधील मार्गदर्शक तत्वांसंदर्भातील कलम ११ खालील अधिसूचना

जा.क्र.२०२०/यू.पी.पी./प्र.क्र.०१
उपविभागीय अधिकारी कार्यालय वसमत
दि.०३.१२.२०२०.

ज्या अर्थी महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात येईल.) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण-११/२०१४/प्रक्र.७७/भाग-२/अ-२ दि.१९.०१.२०१५ अन्वये (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा समुचित शासन मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, हिंगोली जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनी (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त जमिनी" असा करण्यात आला आहे) कार्यकारी अभियंता, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभागीय पथक क्र.४, आखाडा बाळापूर यांच्या उर्ध्व पैनगंगा प्रकल्प कालवा ह्या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहेत अथवा त्यांची गरज भासण्याची शक्यता आहे. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूचि दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत;

आणि ज्याअर्थी सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूचि चार मध्ये दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल यासोबत जोडलेल्या अनुसूचि पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (४) नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीचे कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१३ (ज्याचा उल्लेख यापुढे "उक्त नियम". असा करण्यात येईल.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याने व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी यांनी उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिकाऱ्याची कामे पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, वसमत यांना पदनिर्देशीत केलेले आहे.

(प्रविण फुलारी)
उपविभागीय अधिकारी
तथा भूसंपादन अधिकारी वसमत

उपविभागीय अधिकारी तथा
विशेष भूसंपादन अधिकारी
वसमत

अनुसूचि एक
जमिनीचे वर्णन
संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन

| गाव: गिरगाव ता.वसमत | | |
|---|---|---|
| अ.क्र. | भूमापन क्र. | संपादीत करावयाचे क्षेत्र |
| १ | १२२२ | ०.०१ |
| २ | १२२३ | ०.२२ |
| गाव: मुरुंबा खुर्द ता.वसमत जि.हिंगोली | | |
| | ६ | ०.६३ |
| | १० | ०.१९ |
| गाव: मुरुंबा बु.ता.वसमत | | |
| | ९३ | ०.०८ |
| | ९१ | ०.०१ |
| गाव: पळसगाव तर्फे माळवटा ता.वसमत | | |
| | ६२ | ०.२३ |
| | ६३ | ०.१५ |
| | ६८ | ०.१० |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | ६९ | ०.२२ |
| | ७० | ०.१० |
| | १४२ | ०.९२ |
| | एकुण | २.८६ |

**अनुसूचि दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाबाबत विवरण**

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे नाव | उर्ध्व पैनगंगा प्रकल्प कालव्यासाठी भूसंपादन |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | सिंचन प्रकल्प |
| समाजाला मिळणारे लाभ | कृषि सिंचन |

**अनुसूचि तीन**
भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन होत नाही म्हणुन अनुसूचि तीन लागु नाही.

**अनुसूचि चार**
**सामाजिक परिणाम निर्धारण सारांश:**
भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन होत नाही म्हणून सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाचा सामाजिक परिणाम निर्धारण सारांश लागु नाही.

**अनुसूचि पाच**
**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**
भूधारकांचे विस्थापन होत नसल्यामुळे प्रशासक नियुक्ती लागु नाही.

टिपः उक्त जमिनींबाबतचे आराखडे व तपशिल उपविभागीय अधिकारी कार्यालय, वसमत येथे कार्यालयीन वेळेत निरिक्षण करण्यास उपलब्ध आहे.

(प्रविण फुलारी)
उपविभागीय अधिकारी
तथा भूसंपादन अधिकारी वसमत

उपविभागीय अधिकारी तथा
विशेष भूसंपादन अधिकारी
वसमत

उप विभागीय अधिकारी
वसमत जि. हिंगोली



Scanned by CamScanner